# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

बंधू आणि भगिनींनो,

COVID-१९ सारख्या महाभयंकर महामारीमध्ये आपल्या सर्व एनर्जी सोलजर्सनी ज्या परिस्थितीत आपल्या ONGC ला कार्यरत ठेवले होते हे आज आपल्याला सर्वज्ञात आहे. हे आपले कार्य खरोखरच ONGC च्या इतिहासामध्ये नोंद करण्याजोगे आहे.

परंतु अश्या गंभीर परिस्थितीत देखील आपल्या एम्प्लॉइज बरोबरच खंबीरपणे उभे राहण्या ऐवजी त्यांच्या विरोधी भूमिका घेणाऱ्या कर्मचारी संघटनेचे काही ठळक कामे!

१) COVID सुरू झाल्यावर काही काळानंतर आपल्या ज्यादा कामाकरीता ओव्हरटाईम ची मागणी पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन करत असताना आणि एम्प्लॉइज देखील या मागणीला दुजोरा देत असताना "आधी ड्युटी करा मग ओव्हरटाईमच बोलू असे कामगारांच्या हक्कां विरोधातील कर्मचारी संघटनेचे धोरण का?

२) पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन ची ओव्हरटाईम ची मागणी आणि कर्मचारी संघटनेप्रती एम्प्लॉइजचा रोष पाहून या मागणी चे मग पुन्हा खोटे नाटक कर्मचारी संघटनेकडून का?

३) वेज रीविजन च्या मीटिंग मध्ये आपण १०० तास ओव्हरटाईम पास करून आल्याचे एम्प्लॉइज ना खोटे आश्वासन कर्मचारी संघटनेकडून का देण्यात आले?

४) नेहमी आपल्या प्रस्थाच्या कोरड्या फुशारक्या मारणारी ही बोथट संघटना जेव्हा आपले एम्प्लॉइज, जे ५०-६० दिवस ऑफशोअर मध्ये अडकले होते त्यांच्या करिता पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन प्रमाणे गाड्यांची, तसेच त्या प्रवासाच्या परवानगीची व्यवस्था का नाही करू शकले? त्याकरिता आस्थापनेच्या विनंती वरून पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनलाच पुढाकार का घ्यावा लागला???

५) COVID काळातील ज्यादा कामाकरिता पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनलाच प्रथम मा.श्रम आयुक्त यांचे दार का ठोठवावे लागले???

६) फक्त पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनच ज्यादा कामाच्या प्रश्नावर खंबीर राहून निर्णय आणू शकली त्यावेळी मग अंतिम टप्प्यात कर्मचारी संघटनेला याचा अंदाज आल्यावर मान्यता प्राप्त असल्याचे आव आणत यात घुसखोरी करण्याची गरज का पडली???

७) COVID काळात इतर सर्व मीटिंग करिता दोन्ही युनियन ला बोलविणाऱ्या आस्थापनेला जेव्हा ओव्हरटाईम चा मुद्दा केवळ लांबणीवर टाकण्याकरिता डेहराडून ला पाठवायचा होता तेव्हा फक्त कर्मचारी संघटनेलाच मीटिंग करीता का बोलावण्यात आले.?? यामागचे गुपित हेच का की पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियाल ला बोलल्यास आपण या गोष्टीसाठी कधीच तयार झालो नसतो कारण हा विषय स्थानिक आस्थापनेच्या पातळीवर सुटणारा होता हे आपण पूर्ण जाणून होतो हे खरे की खोटे?

# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

८) HOTEL QUARANTINE कमी करणे असो, DUTY PERIOD कमी करणे असो किंवा VACCINATION असो कर्मचारी संघटना मान्यता प्राप्त असताना देखील नेहमी केवळ पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनलाच या सर्व मुद्द्यांसाठी अस्थपनेसमोर या मागण्यांसाठी उभे का राहावे लागले.???

९) २३/०३/२०२० ते ११/०४/२०२१ या कालावधीतील १४ दिवसांवरील ज्यादा कामाकरीता देखील मा.श्रम आयुक्त यांच्याकडे दार ठोठावणारी देखील पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनच का? मग मान्यता प्राप्तीचा हा मुकुट आपल्या डोक्यावर केवळ आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठीच का?

१०) आत्ताचे ताजे उदाहरण पहायचे झाल्यास, सध्या कोविड काळातील १४ ते २१ दिवसांतील OT मिळण्याबाबतचे प्रकरण लेबर कामिशनर कडे pending असताना, लेबर कामिशनर ऑफिसच्या डिलींग ऑफिसर(ALC) ची बदली झाली आणि त्याजागी नवीन कोणाची नेमणूक अजून झाली नाही म्हणून हे प्रकरण प्रलंबित आहे. असे असतानाही फक्त निवडणुकीच्या तोंडावर आपण काही तरी करतो आहे असे भासवण्यासाठी ED-HRO ना १९.०७.२०२३ लेटर देवून OT रीलीज करण्यास सांगितले. इतक्या वर्षाचा अनुभव असलेल्या नेत्याला हे माहीत नाही का की हा OT मॅनेजमेंट देत नाही म्हणून तर प्रकरण लेबर कामिशनर कडे नेण्यात आले आहे ना?

बंधू भगिनींनो कामगारांच्या अधिकारांची राख रांगोळी ही संघटना नेहमीच करत आली आहे. आता वेळ आहे आपल्या निर्णयाची. नेहमी कामगार विरोधी भूमिका घेणाऱ्या संघटनेला साथ न देता, नेहमी आपल्या बरोबर खंबीर उभे राहणाऱ्या पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन लाच आपले मौल्यवान मत देऊन आपले हक्क आणि अधिकारांची होणारी घुसमट आता थांबवुया आणि पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनलाच बहुमतांनी विजयी करूया!



**Symbol of Trust: RIG**

**Vote & Support: - Petroleum Employees Union (W.O.U.)**

Long Live ONGC !! P.E.U. Zindabad !! Worker Union